Exampapers247 राज्यसेवा (मुख्य) परीक्षा-2015 Exampapers247

A

2015

परीक्षा दि. 13 सप्टेंबर, 2015

CODE : **KO6**

प्रश्नपुस्तिका क्रमांक / BOOKLET NO. 104777

प्रश्नपुस्तिका

सामान्य अध्ययन - I

वेळ : 2 (दोन) तास

एकूण प्रश्न : 150

एकूण गुण : 150

सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.



(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्या विषयाचा प्रत्येक प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आला आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच ''उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरापैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक तीन चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील''.**

ताकीद

ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या ''परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82'' यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.

पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

1. 1919 च्या मॉंटेग्यू चेम्सफर्ड कायद्यात खालीलपैकी कोणत्या तरतूदी होत्या ?

(a) भारतीय मंत्र्याचा पगार इंग्लडच्या तिजोरीतून दिला जावा.

(b) भारतीय उच्च आयुक्त हा भारताच्या व्हॉइसरॉयचा इंग्लडमधील प्रतिनिधी म्हणून काम पाहील.

(c) प्रांतांमध्ये द्विदल राज्यपद्धती निर्माण करावी.

(d) भारतीय मंत्र्याचा पगार भारताच्या तिजोरीतून दिला जावा.

पर्यायी उत्तरे :

(1) (a), (b) आणि (c) फक्त (2) (a), (c) आणि (d) फक्त

(3) (b), (c) आणि (d) फक्त (4) (c) आणि (d) फक्त

Which of the following were the provisions of the Montegue Chelmsford Act 1919 ?

(a) The salary of the Secretary of State for India should be paid from the treasury of England.

(b) Indian High Commissioner should work as the representative of the Viceroy of India in England.

(c) Dual system of government should be started in the provinces.

(d) The salary of the Secretary of State for India should be given from the treasury of India.

Answer options :

(1) (a), (b) and (c) only (2) (a), (c) and (d) only

(3) (b), (c) and (d) only (4) (c) and (d) only

---

2. भारताचे संविधान 26 जानेवारी 1950 रोजी रुढ झाले. त्याबाबतीतील पुढील दोन विधानांपैकी कोणते **योग्य** आहे ?

(a) हा दिनांक निवडण्यात आला कारण काँग्रेसने डिसेम्बर 1929 च्या लाहोरच्या अधिवेशनात पूर्ण स्वराज्याची मागणी मान्य केली व सर्व भारतीयांना आवाहन केले होते की हा दिवस प्रत्येक वर्षी स्वतंत्रता दिवस म्हणून पाळला जावा.

(b) संविधानाचे उगमस्थान अधिनियम 1935 मध्ये व अमेरिका, स्वित्झरलँड, आयरलँड, ब्रिटेन, फ्राँस व स्पेन यांच्या संविधानात आहे.

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

The Constitution of India came into force on 26th January 1950. Which one of the following two statements about it is **correct** ?

(a) The reason for choosing this date was that the Congress which had adopted Purna Swaraj resolution at Lahore in December 1929 had urged upon the Indians to observe 26th January as Independence Day every year.

(b) The sources of the Constitution are based on the Act of 1935 and the Constitutions of the United States of America, Switzerland, Ireland, Britain, France and Spain.

Answer options :

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

3. पाँडिचेरी बाबत पुढील दोन विधानांपैकी कोणते **खरे नाही** ?

(a) सन 1761 व 1816 मध्ये पाँडिचेरीवर फ्रान्स व पोर्तुगालचे आलटून पालटून वर्चस्व होते.

(b) फ्रान्सने अंतिमत: 26 सप्टेंबर 1816 रोजी पाँडिचेरीवर आपली सत्ता स्थापित केली जी 31 ऑक्टोबर 1954 पर्यंत चालली.

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which one of the following two statements about Pondichery is **not true** ?

(a) Between 1761 and 1816 the control over Pondicherry swung between France and Portugal.

(b) France finally established her rule over Pondicherry on 26 September 1816 and it continued upto 31st October 1954.

Answer options :

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

4. पुढील दोन विधानांपैकी कोणते **योग्य नाही** ?

(a) भारत व इंग्लंड मधील कितीतरी इंग्रजांना इंडियन असोशिएशन स्थापन झालेले आवडले नाही म्हणून त्यांना एक पर्याय हवा होता.

(b) सर ए.ओ. ह्यूम जो की एक निवृत्त नागरी अधिकारी होता त्याची अशी इच्छा होती की एक संस्था जी एक सेफ्टी व्हॉल्व म्हणून स्थापन व्हावी आणि काँग्रेसची स्थापना झाली. गव्हर्नर जनरल लॉर्ड डफरीन ह्यांचा त्यांना पूर्ण पाठिंबा होता.

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which one of the following two statements is **not correct** ?

(a) Several Englishmen both in India and England did not like the establishment of Indian Association. Hence they thought of an alternative to this organisation.

(b) Sir A.O. Hume, a retired civil servant, desired an organisation which would serve as a safety valve and thus the Congress was founded. Lord Duffrein, the Governor General gave him his full support.

Answer options :

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

5. पुढील दोन विधानांपैकी कोणते **योग्य नाही** ?

(a) स्वतंत्र भारताचे प्रथम सरकार जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली होते. सर्व मंत्री काँग्रेसचे सदस्य होते.

(b) अन्नधान्याची कमतरता सोव्हिएत युनियन व युनायटेड स्टेटस्कडून आयात करून मिटवली गेली.

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which one of the following two statements is **not correct** ?

(a) The first government of free India was led by Jawaharlal Nehru. All the ministers were the members of the Congress.

(b) Food shortages were met by shipments of food from the Soviet Union and the United States.

Answer options :

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

6. पुढील विधानांपैकी कोणते **योग्य नाही** ?

(1) इंग्रज इंडियन नॅशनल आर्मी व तिच्या पुढाऱ्यांच्या अतिशय विरोधात होते.

(2) इंग्रजांनी त्यांच्या प्रमुख 3 अधिकाऱ्यांवर : गुरुबक्षसिंग धिल्लो, शाह नवाझ खान व पी.के. सेहगल यांच्यावर लाल किल्ला दिल्ली येथे इंग्रजांविरुद्ध लढा देण्यास्तव केस चालविली.

(3) त्या सर्वांवर गुन्हा साबीत केला.

(4) त्याप्रमाणे त्या तिघांना शिक्षा झाली.

Which one of the following statements is **not correct** ?

(1) The British attitude towards the INA and its leaders was very hostile.

(2) They put to trial three of its most prominent Officers Gurubakshah Singh Dhillon, Shah Nawaz Khan and P.K. Sehgal at Delhi Red Fort for fighting against the British.

(3) All of them were convicted.

(4) They were accordingly punished.

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

7. पुढीलपैकी कोणते भारतीय सदस्य 1917 च्या सॅडलर आयोगात होते ?

(a) सुरेन्द्रनाथ बॅनर्जी (b) दादाभाई नौरोजी

(c) आशुतोष मुखर्जी (d) झियाउद्दीन अहमद

पर्यायी उत्तरे :

(1) (a) आणि (b) फक्त (2) (b) आणि (c) फक्त

(3) (c) आणि (d) फक्त (4) (a) आणि (d) फक्त

Who from amongst the following Indians were the members of the Sadler Commission of 1917 ?

(a) Surendranath Banerjee (b) Dadabhai Nauroji

(c) Ashutosh Mukherjee (d) Ziyauddin Ahmed

Answer options :

(1) (a) and (b) only (2) (b) and (c) only

(3) (c) and (d) only (4) (a) and (d) only

---

8. जोड्या जुळवा :

(a)	अलीगढ चळवळ	(i)	मोहम्मद अली
(b)	मोहमेडन लिटररी सोसायटी	(ii)	सर सय्यद अहमद खान
(c)	अहमदीया चळवळ	(iii)	अब्दुल लतीफ
(d)	जामिया मिल्लीया इस्लामीया	(iv)	मिर्झा गुलाम मोहम्मद

पर्यायी उत्तरे :

	(a)	(b)	(c)	(d)
(1)	(i)	(iii)	(iv)	(ii)
(2)	(ii)	(iv)	(iii)	(i)
(3)	(iv)	(ii)	(i)	(iii)
(4)	(ii)	(iii)	(iv)	(i)

Match the pairs :

(a)	Aligarh Movement	(i)	Mohammad Ali
(b)	Mohmaiden Literary Society	(ii)	Sir Sayyed Ahmed Khan
(c)	Ahmediya Movement	(iii)	Abdul Latif
(d)	Jamiya Miliya Islamiya	(iv)	Mirza Gulam Mohammad

Answer options :

	(a)	(b)	(c)	(d)
(1)	(i)	(iii)	(iv)	(ii)
(2)	(ii)	(iv)	(iii)	(i)
(3)	(iv)	(ii)	(i)	(iii)
(4)	(ii)	(iii)	(iv)	(i)

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

9. स्वराज पार्टीची स्थापना झाल्यावर, गांधीजींना हवे होते की काँग्रेसजनांनी ग्रामीण भागात विधायक कामे करावीत. त्यात काय सम्मिलित नव्हते ?

(1) दारूबंदी मोहीम

(2) कमजोर वर्गात व अस्पृश्यांकरता सामाजिक कार्य

(3) सर्व वर्गांकरता इस्पितळांची स्थापना

(4) राष्ट्रीय शाळांची स्थापना

After the formation of Swaraj Party, Gandhiji wanted Congressmen to start constructive work in villages. What did it not include ?

(1) anti liquor campaign.

(2) social work among depressed classes and untouchables.

(3) establishment of hospitals for all.

(4) establishment of national schools.

---

10. सर्फ-ए-खास म्हणजे काय ?

(1) हैदराबादच्या निजामाच्या मालकीच्या जमिनी

(2) हैदराबादच्या निजामाच्या कुटुंबियांना असणारी पदवी

(3) हैदराबादच्या निजामाचे सल्लागार मंडळ

(4) हैदराबादच्या निजामाच्या राजवाड्याचा भाग

What is meant by Sarf-e-Khas ?

(1) Lands belonging to the Nizam of Hyderabad

(2) The title given to the family members of the Nizam of Hyderabad

(3) The Council of advisors of the Nizam of Hyderabad

(4) Part of the Palace of the Nizam of Hyderabad

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

11. जोड्या जुळवा :

भारतीय राष्ट्रीय काँग्रेसची अधिवेशने, स्थळ व वर्षे	अध्यक्ष
(a) कलकत्ता (1886)	(i) ॲनी बेझंट
(b) अलाहाबाद (1888)	(ii) दादाभाई नौरोजी
(c) वाराणसी (1905)	(iii) जॉर्ज युल
(d) कलकत्ता (1917)	(iv) गोपाळकृष्ण गोखले

पर्यायी उत्तरे :

	(a)	(b)	(c)	(d)
(1)	(i)	(iv)	(iii)	(ii)
(2)	(ii)	(iii)	(iv)	(i)
(3)	(iii)	(iv)	(i)	(ii)
(4)	(iv)	(iii)	(ii)	(i)

Match the pairs :

Sessions of the Indian National Congress, Places and Years	**Presidents**
(a) Calcutta (1886)	(i) Annie Besant
(b) Allahabad (1888)	(ii) Dadabhai Nauroji
(c) Varanasi (1905)	(iii) George Yul
(d) Calcutta (1917)	(iv) Gopalkrishna Ghokhale

Answer options :

	(a)	(b)	(c)	(d)
(1)	(i)	(iv)	(iii)	(ii)
(2)	(ii)	(iii)	(iv)	(i)
(3)	(iii)	(iv)	(i)	(ii)
(4)	(iv)	(iii)	(ii)	(i)

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

12. भारतीय अर्थतज्ञ रोमेश दत्त यांनी लॉर्ड कर्झनला एक अनावृत्त पत्र लिहून शेतकऱ्यांच्या आर्थिक हालाखीची पुढीलपैकी कोणती कारणे सांगितली होती ?

(a) अवास्तव जमीन महसूल

(b) दुष्काळ

(c) कालव्याकडे सरकारचे दुर्लक्ष

(d) विविध कर

पर्यायी उत्तरे :

(1) (a) आणि (d) बरोबर (2) (b) आणि (c) बरोबर

(3) (c) आणि (a) बरोबर (4) (d) आणि (b) बरोबर

Indian economist Romesh Dutta had written an open letter to Lord Curzon stating which of the following reasons for the poor economic condition of the farmers ?

(a) Excessive Land Revenue

(b) Droughts

(c) The government overlooked the canals

(d) Various Taxes

Answer options :

(1) (a) and (d) Correct (2) (b) and (c) Correct

(3) (c) and (a) Correct (4) (d) and (b) Correct

---

13. पुढील दोन विधानांपैकी कोणते **योग्य नाही** ?

(a) सोहन सिंग भाकना आणि त्यांच्या क्रांतिकारी मित्रांनी सन 1907 मध्ये कॅलिफोर्निया येथे इंडियन इंडिपेंडन्स लीगची स्थापना केली. लाला हरदयाल यांच्या येण्यानंतर 1911 मध्ये या संस्थेच्या कारवाया वाढल्या.

(b) तारकानाथ यांनी सन 1913 मध्ये सॅन फ्रँसिस्को येथे गदर पार्टीची स्थापना केली. त्यांनी अमेरिकाभर फिरून तेथे राहणाऱ्या भारतीयांमध्ये इंग्रजांविरूद्ध भावना जागृत केल्या.

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which one of the following two statements is **not correct** ?

(a) Sohan Singh Bhakna and his revolutionary friends set up the Indian Independence League at California in 1907. The activities of the league increased in 1911 with the arrival of Lala Har Dayal.

(b) In 1913 Tarakanath founded Ghadar Party at San Fransisco. He toured America extensively and tried to arouse anti British sentiments among the Indian settlers.

Answer options :

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

14. पुढील विधानांपैकी कोणते **अयोग्य** आहे ?
(1) भारताचे अमेरीकेशी संबंध कधीच फार सलोख्याचे नव्हते.
(2) भारताने न्युक्लियर नॉन प्रॉलिफरेशन ट्रिटी वर सही करण्यास नकार दिल्याने ही परिस्थिती उद्‌भवली.
(3) परंतु या संबंधात फरक पडला 11 सप्टेंबर 2001 नंतर.
(4) वरील एकही नाही.

Which one of the following statements is **incorrect** ?
(1) India's relations with United States were never very cordial.
(2) The bone of contention is Indias refusal to sign Nuclear Non Proliferation Treaty.
(3) However the relationship changed after 11 September 2001.
(4) None of the above.

---

15. पुढील दोन विधानांपैकी कोणते **योग्य** आहे ?
(a) साउथ इंडियन लिबरल फेडरेशन हे *ॲन्टी होमरूल लीग* या नावानेही ओळखले जात असे.
(b) साउथ इंडियन लिबरल फेडरेशन ने होमरूल सध्या लागू करू नये असा अहवाल मॉंटेग्यूला दिला.

पर्यायी उत्तरे :
(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which one of the following two statements is **correct** ?
(a) The South Indian Liberal Federation was also known as *Anti Homerule League.*
(b) The South Indian Liberal Federation submitted a report to Montegue that Home Rule should not be granted to India then.

Answer options :
(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

16. 1857 च्या उठावात खालीलपैकी कोण सहभागी होते ?
(a) सावंतवाडीचे रामजी शिरसाट
(b) झीनत महाल बेगम
(c) खान बहादूरखान रोहिला
(d) नसरत शाह

पर्यायी उत्तरे :
(1) (a), (b) आणि (c) फक्त (2) (b), (c) आणि (d) फक्त
(3) (a) आणि (c) फक्त (4) (c) आणि (d) फक्त

Who from amongst the following participated in the Revolt of 1857 ?
(a) Ramaji Shirsat of Sawantwadi
(b) Zinnat Mahal Begum
(c) Khan Bahadurkhan Rohila
(d) Nusrat Shah

Answer options :
(1) (a), (b) and (c) only (2) (b), (c) and (d) only
(3) (a) and (c) only (4) (c) and (d) only

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

17. • त्यांनी 1895 च्या पुण्यातील भारतीय राष्ट्रीय काँग्रेस अधिवेशनात भाग घेतला.
• मुंबई व युरोपात वैद्यकीय शिक्षण घेऊन त्या डॉक्टर झाल्या.
• कोल्हापूर संस्थानात सरकारी इस्पितळात त्यांनी डॉक्टर म्हणून सेवा बजावली.

त्या कोण होत्या ?

(1) रखमाबाई (2) आनंदीबाई जोशी
(3) कृष्णाबाई केळवकर (4) काशीबाई कानिटकर

• She participated in the Pune Session of the Indian National Congress in 1895.
• She became a doctor after having studied medicine in Mumbai and Europe.
• She joined duty as a doctor in a state owned hospital in the Kolhapur state.

Who was she ?

(1) Rakhmabai (2) Anandibai Joshi
(3) Krushnabai Kelavkar (4) Kashibai Kanitkar

---

18. पुढील विधानांपैकी कोणते **योग्य नाही** ?

(1) दिनांक 24 मार्च 1947 रोजी लॉर्ड वेवेल यांच्याऐवजी लॉर्ड माऊंटबॅटन आले व भारताचे व्हाइसरॉय झाले.
(2) दि. 3 जून 1947 रोजी त्यांनी भारताचे दोन स्वतंत्र व सार्वभौम भाग भारत व पाकिस्तान जाहीर केले.
(3) काँग्रेसला भारताचे विभाजन जात जमातीच्या तत्वावर कधीच नको होते.
(4) काँग्रेसला विभाजन मान्य करावे लागले कारण ब्रिटिश सरकारने त्यांच्या स्वत:च्या स्वार्थासाठी ते भारतावर लादले.

Which one of the following is **not correct** ?

(1) On 24th March 1947 Lord Mountbatten replaced Lord Wavell and became the Viceroy of India.
(2) On 3rd June 1947 he announced division of India into two independent and sovereign states - India and Pakistan.
(3) The Congress never wanted the country's division on communal lines.
(4) The Congress had to accept the division because the British Government insisted upon it for their own selfish reasons.

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

19. खालीलपैकी **बरोबर** विधाने कोणती ?

(a) राष्ट्रकूट काळातील सर्वात श्रेष्ठ लेणे म्हणजे कैलास लेणे होय.

(b) वेरुळ येथील जैनांची लेणी दिगंबर पंथीयांची आहेत.

(c) चालुक्याच्या राजवटीत पट्टकदल, बदामी व तेर या ठिकाणी अनेक सुंदर मंदिरे बांधली गेली.

(d) घारापुरी येथील लेण्यातील त्रिमुखी मूर्ती शिल्प प्रसिद्ध आहे.

पर्यायी उत्तरे :

(1) (a) आणि (b) फक्त (2) (a) आणि (c) फक्त

(3) (b) आणि (c) फक्त (4) वरील सर्व बरोबर

Which of the following statements are **correct** ?

(a) The most outstanding cave of the Rastrakut period is the Kailash cave.

(b) The Jain caves at Verul belong to the Digambar sect.

(c) Many beautiful temples were built at Pattakadal, Badami and Ter during the Chalukyan period.

(d) Trimukhi idol sculpture in the Gharapuri caves is well known.

Answer options :

(1) (a) and (b) only (2) (a) and (c) only

(3) (b) and (c) only (4) All the above are correct

---

20. भारताचे रशियाच्या संदर्भात पुढील विधानांपैकी कोणते विधान **खरे नाही** ?

(1) आपले रशियाशी संबंध नेहमी चांगले राहिले आहेत.

(2) जागतिक स्तरावर न रशिया न भारत कधी एकमेकांविरुद्ध कोणाशी सहभागी झाले.

(3) भारत, रशिया शांतता, मैत्री व सहकार करार व काश्मिर प्रश्नावर ताश्कंद करार (1966) रशियाच्या पुढाकारामुळे झाला.

(4) सोव्हिएत युनियन कोसळल्यानंतर मात्र नवी दिल्ली आणि मॉस्को यांचे संबंध सलोख्याचे राहिले नाहीत.

Which one of the following statements about our relations with the Soviet Union is **not correct** ?

(1) Our relations with Russia have always remained cordial.

(2) At the global level neither Russia nor India has ever cherished an idea of joining any alliance against one another.

(3) Indo Soviet Treaty of Peace, Friendship Cooperation and the Tashkant Agreement (1966) signed over the Kashmir issue was at the instance of Moscow.

(4) After the collapse of the Soviet Union the relations between New Delhi and Moscow are not cordial.

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

21. भारताच्या फाळणीनंतर एफ.एन्. सूझा, एस्.एच्. रझा, के.एच्. आरा, एच्.ए. गाडे, एस्.के. बाक्रे आणि एका व्यक्तीने मिळून बॉम्बे प्रोग्रेसिव्ह आर्टिस्ट्स् ग्रूप स्थापन केला. सहावी व्यक्ती कोण होती ?

(1) एम्.एफ. हुसैन (2) पृथ्वीराज कपूर

(3) ए.के. हंगल (4) अण्णाभाऊ साठे

After India's partition, F.N. Souza, S.H. Raza, K.H. Ara, H.A. Gade, S.K. Bakre and one more person came together to form the Bombay Progressive Artists' Group. Who was the sixth person ?

(1) M.F. Hussain (2) Prithviraj Kapoor

(3) A.K. Hangal (4) Annabhau Sathe

---

22. 1945 मध्ये दिल्लीच्या लाल किल्ल्यात आझाद हिंद फौजेवर चाललेल्या खटल्याचे वेळी वकील कोण होते ?

(a) पंडीत जवाहरलाल नेहरु (b) भुलाभाई देसाई

(c) डॉ. बाबासाहेब आंबेडकर (d) तेजबहादूर सप्रू

पर्यायी उत्तरे :

(1) (a), (b) आणि (d) फक्त (2) (b), (c) आणि (d) फक्त

(3) (a) आणि (b) फक्त (4) (a) आणि (d) फक्त

Who were the lawyers at the time of Azad Hind Sena's prosecution at Red Fort in Delhi in 1945 ?

(a) Pandit Jawaharlal Nehru (b) Bhoolabhai Desai

(c) Dr. Babasaheb Ambedkar (d) Tej Bahadur Sapru

Answer options :

(1) (a), (b) and (d) only (2) (b), (c) and (d) only

(3) (a) and (b) only (4) (a) and (d) only

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

23. देशी भाषिक वृत्तपत्र कायदा 1878 च्या बाबतीत खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(a) देशी भाषिक वृत्तपत्राचे मुद्रक व प्रकाशक यांचेकडून सरकारी धोरणावर टीका न करण्याची लेखी हमी घेतली जात असे.

(b) सरकारच्या कार्यवाहीविरुद्ध न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार वृत्तपत्र व्यवसायिकांना देण्यात आला नव्हता.

(c) हा कायदा फक्त देशी भाषिक वृत्तपत्रांनाच लागू होता.

पर्यायी उत्तरे :

(1) (a) आणि (c) फक्त (2) (a) व (b) फक्त

(3) (a), (b) आणि (c) फक्त (4) (b) व (c) फक्त

Which of the following statements are **true** about the Vernacular Press Act of 1878 ?

(a) Vernacular Newspaper publishers and printers had to give in writing that they will not criticize the government policies.

(b) The owners of Printing Press had no right to go to the court against the action taken by the government.

(c) This act was applicable only to the Vernacular Newspapers.

Answer options :

(1) (a) and (c) only (2) (a) and (b) only

(3) (a), (b) and (c) only (4) (b) and (c) only

---

24. डिप्रेस्ड क्लासेस मिशनच्या संदर्भात खालीलपैकी कोणती विधाने **बरोबर** आहेत ?

(a) 1910 मध्ये मुरळी प्रतिबंधक सभा भरविली.

(b) 1912 मध्ये अस्पृश्यता निवारण परिषद भरविली.

(c) पुणे येथे अहिल्याश्रमाची स्थापना.

(d) समता संघाची स्थापना.

पर्यायी उत्तरे :

(1) (a), (b) आणि (c) फक्त (2) (b) आणि (c) फक्त

(3) (b), (c) आणि (d) फक्त (4) (a) आणि (d) फक्त

Which of the following statements are **true** regarding the depressed classes Mission ?

(a) Arranged a meeting for prohibition of Murali custom in 1910.

(b) Organized a conference for redressal of Untouchability in 1912.

(c) Establishment of Ahilyashram at Pune.

(d) Establishment of Samata Sangh.

Answer options :

(1) (a), (b) and (c) only (2) (b) and (c) only

(3) (b), (c) and (d) only (4) (a) and (d) only

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

25. योग्य जोड्या लावा :

(a)	राम जोशी	(i)	लटपट-लटपट तुझं चालणं ग मोठ्या नखऱ्याचं
(b)	परशराम	(ii)	सुंदरा मनामधे भरली
(c)	सगन भाऊ	(iii)	निर्मल मुखडा चंद्राकार सरळ नाकाची शोभते धार
(d)	होनाजी बाळा	(iv)	लेकराला माय विसरली कसा ईश्वरतारी

पर्यायी उत्तरे :

	(a)	(b)	(c)	(d)
(1)	(ii)	(iii)	(iv)	(i)
(2)	(i)	(ii)	(iv)	(iii)
(3)	(ii)	(iv)	(i)	(iii)
(4)	(iii)	(iv)	(ii)	(i)

Match the pairs :

(a)	Ram Joshi	(i)	Latpat Latpat Tujh Chalana Ga Mothya Nakharyacha
(b)	Parashram	(ii)	Sundara Manamadhe Bharali
(c)	Sagan Bhau	(iii)	Nirmal Mukhada Chandrakar Saral Nakachi Shobhate Dhar
(d)	Honaji Bala	(iv)	Lekarala May Visarali Kasa Ishwartari

Answer options :

	(a)	(b)	(c)	(d)
(1)	(ii)	(iii)	(iv)	(i)
(2)	(i)	(ii)	(iv)	(iii)
(3)	(ii)	(iv)	(i)	(iii)
(4)	(iii)	(iv)	(ii)	(i)

---

26. 1858 च्या राणीच्या जाहीरनाम्यात पुढीलपैकी कोणत्या तरतुदी नव्हत्या ?

(a) भारतीयांच्या धार्मिक जीवनात सरकार हस्तक्षेप करणार नाही.

(b) भारतीय संस्थानिकांशी इंग्रजांनी केलेले करार पाळले जातील.

(c) अराजक असलेली संस्थानेच खालसा केली जातील.

(d) उच्च जातीच्या लोकांना नोकऱ्या दिल्या जातील.

पर्यायी उत्तरे :

(1) (a) आणि (c) (2) (b) आणि (d) (3) (b) आणि (c) (4) (c) आणि (d)

Which of the following terms were not included in the Queen's proclamation of 1858 ?

(a) The government will not interfere in the religious life of the Indians.

(b) The treaties signed between the English and the Indian Princes will be honoured.

(c) Only the states with anarchy will be annexed.

(d) Higher caste people will be given jobs.

Answer options :

(1) (a) and (c) (2) (b) and (d) (3) (b) and (c) (4) (c) and (d)

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

27. लीलाताई पाटील, विजयाताई लाड, लक्ष्मीबाई नायकवडी आणि राजूताई पाटील या स्त्रियांच्यात कोणती गोष्ट समान आहे ?

(1) त्यांचे विवाह सत्यशोधक पद्धतीने झाले.

(2) त्या आझाद हिंद सेनेच्या सदस्या होत्या.

(3) त्यांनी गोवा मुक्तीसंग्रामात भाग घेतला.

(4) त्यांनी सातारच्याच्या प्रतिसरकारमध्ये सहभाग घेतला.

What is a common factor among the ladies - Leelatai Patil, Vijayatai Lad, Laxmibai Nayakwadi and Rajutai Patil ?

(1) They were married according to Satyashodhak rites.

(2) They were the members of Azad Hind Sena.

(3) They participated in the Goa Liberation Movement.

(4) They participated in the Prati Sarkar of Satara.

---

28. नेहरू कमिटी अहवालाबाबत पुढील दोन विधानांपैकी कोणते विधान **खरे नाही** ?

(a) त्याने इंग्रजांच्या कॅनडा व ऑस्ट्रेलियातील वसाहतींमध्ये असल्याप्रमाणे स्वराज्य (Self Rule) ची मागणी केली.

(b) त्याने अशीही इच्छा प्रदर्शित केली की विविध भागांची त्यांच्या नैसर्गिक भौगोलिक परिस्थितीनुसार पुनर्रचना व्हावी.

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which one of the following two statements is **not correct** about the Nehru Committee Report ?

(a) It demanded Self Rule of the kind as it existed in other British colonies like Canada and Australia.

(b) It also favoured reorganisation of provincial boundaries on their natural geographic basis.

Answer options :

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

29. पुढीलपैकी कोणते विधान सर सय्यद अहमद खान यांचे आहे ?

(a) आधुनिक शिक्षणाचा व इंग्रजी भाषेचा स्वीकार केल्याशिवाय मुस्लीम समाजाची प्रगती होणे अवघड आहे.

(b) हिंदू व मुसलमान म्हणजे 'भारत वधूचे' नेत्र होत.

(c) हिंदुस्थानात हिंदू व मुसलमान ही दोन राष्ट्रे आहेत.

(d) मुसलमानांनी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसपासून दूर राहावे.

पर्यायी उत्तरे :

(1) (a) आणि (b) (2) (c) आणि (d)

(3) (c) फक्त (4) वरील सर्व

Which of the following statements was/were made by Sir Sayyed Ahmed Khan ?

(a) Unless the modern education and English language are adopted, the progress of Muslims is difficult.

(b) Hindus and Muslims are the two eyes of an Indian bride.

(c) Hindu and Muslim are two separate nations in Hindustan.

(d) Muslims should stay away from Indian National Congress.

Answer options :

(1) (a) and (b) (2) (c) and (d)

(3) (c) only (4) All of the above

---

30. पुढील दोन विधानांपैकी कोणते **खरे** आहे ?

(a) घटनासमितीमध्ये जम्मू व काश्मिरचे प्रतिनिधी म्हणून पंतप्रधान शेख अब्दुल्ला आणि त्यांच्या नामनिर्देशित व्यक्तींना स्थान दिले गेले. हे जवाहरलाल नेहरूंच्या सांगण्यावरून केले गेले.

(b) घटना समितीच्या सर्व सदस्यांनी उपरोक्त सूचनेला एकमताने पाठिंबा दिला.

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which one of the following two statements is **correct** ?

(a) In the Constituent Assembly the J & K was represented by the Prime Minister Sheikh Abdullah and his nominees. This was done at the behest of Jawaharlal Nehru.

(b) All the members of the Constituent Assembly unanimously agreed with the above suggestion.

Answer options :

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

31. क्रांतिसिंह नाना पाटील :

(a) यांनी अस्पृश्यांना मंदिर प्रवेश देण्यास पाठिंबा दिला.

(b) यांच्यावर 1946 मध्ये मध्य प्रांताच्या सरकारने भाषण बंदी लादली.

(c) यांना आचार्य प्र.के. अत्रे यांनी 'क्रांतिसिंह' हे नामाभिधान दिले.

पर्यायी उत्तरे :

(1) (a) आणि (b) बरोबर आहेत, (c) चूक आहे.

(2) (b) आणि (c) बरोबर आहेत, (a) चूक आहे.

(3) (a), (b), (c) तीनही विधाने बरोबर आहेत.

(4) (a), (b), (c) तीनही विधाने चूक आहेत.

Krantisingh Nana Patil :

(a) Supported temple entry of untouchables.

(b) Was forbidden from making public speeches by the Central Provinces Government in 1946.

(c) Was given the title Krantisingh (Lion of the Revolution) by Acharya P.K. Atre.

Answer options :

(1) (a) and (b) are correct, (c) is incorrect.

(2) (b) and (c) are correct, (a) is incorrect.

(3) (a), (b), (c) are all correct.

(4) (a), (b), (c) are all incorrect.

---

32. पुढील दोन विधानांपैकी कोणते **योग्य** आहे ?

(a) 1962-63 च्या भारत - चीन सीमासंघर्षानंतर भारताने भुतानला मोठ्या प्रमाणात लष्करी मदत दिली.

(b) तत्पूर्वी ब्रिटिश साम्राज्याशीही भुतानचे अतिशय सलोख्याचे संबंध होते व त्यांना सर्वप्रकारची मदत ब्रिटिश सरकारकडून व्हावयाची.

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which of the following two statements is **correct** ?

(a) Following the Indo-Chinese border conflict in 1962-63, India gave large-scale military assistance to Bhutan.

(b) Bhutan also had a very cordial relationship with the British Govt. earlier and had all the help from them.

Answer options :

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

33. ते कलकत्ता येथील दक्षिणेश्वरच्या काली देवळाचे मुख्य पुजारी होते. त्यांनी असेही म्हटले की सर्व धर्म एकाच भगवंताकडे वळतात.

ती व्यक्ती कोण ?

(1) दयानंद सरस्वती

(2) भारतेंदू हरीशचंद्र

(3) बंकिमचंद्र चट्टोपाध्याय्य

(4) रामकृष्ण परमहंस

He was the chief priest of the Kali temple of Dakshineshwar near Calcutta. He also said that all the religions lead to the same God.

Identify the person.

(1) Dayananda Saraswati

(2) Bharatendu Harishchandra

(3) Bankimchandra Chattopadhyaya

(4) Ramkrishna Paramhamsa

---

34. पुढील चार विधानांपैकी कोणते **चुकीचे** आहे ?

(1) स्वातंत्र्यानंतर लगेचच पाकिस्तानमधून आक्रमक काश्मीरमध्ये घुसले.

(2) जम्मू व काश्मिरच्या लोकांनी त्यांना मदत केली.

(3) भारतीय फौज आक्रमकांशी लढायला पाठविली गेली.

(4) राज्य भारतात विलीन झाले.

Which one of the following four statements is **incorrect** ?

(1) Soon after independence raiders from Pakistan invaded Kashmir.

(2) The people of Jammu and Kashmir supported them.

(3) The Indian army was sent to fight against the invaders.

(4) The State got acceded to India.

---

35. वि.दा. सावरकर यांनी 7 ऑक्टोबर 1905 रोजी पुण्यात परदेशी कापडाची होळी केली. त्यावेळी हे स्वातंत्र्यसैनिक उपस्थित होते.

(1) शिवराम परांजपे (2) रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे

(3) काशिनाथ कृष्णाजी आठवले (4) सखाराम गणेश देऊस्कर

V.D. Savarkar conducted a bonfire of imported cloth in Pune on 7th October, 1905. This freedom fighter was also present on the occasion.

(1) Shivram Paranjape (2) Raghunath Purushottam Paranjape

(3) Kashinath Krushnaji Athavale (4) Sakharam Ganesh Deuskar

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

36. भारताच्या नियोजनबद्ध आर्थिक आधुनिकीकरणात तीन पोलाद उत्पादन कारखान्यांचा समावेश होता, ज्यांची उभारणी जर्मनी, सोव्हिएत रशिया व ग्रेट ब्रिटनच्या सहकार्याने झाली. त्यापैकी कोणत्या कारखान्याला निकिता ख्रुश्चेव्ह यांनी भेट दिली ?

(1) भिलाई (2) राउरकेला (3) दुर्गापूर (4) बोकारो

Planned Economic modernisation of India included the construction of three Steel Plants, with the help of Germany, USSR and Great Britain. Which of them was visited by Nikita Khrushchev ?

(1) Bhilai (2) Rourkela (3) Durgapur (4) Bokaro

37. नेहरूंच्या स्वप्नांना प्रत्यक्षात आणणाऱ्या दोन महत्वपूर्ण विज्ञानविषयक संस्था विख्यात वैज्ञानिक होमी भाभा यांनी स्थापन केल्या व त्यांचे नेतृत्वही केले. यांतील एक संस्था म्हणजे अणुशक्ती आयोग. दुसरी संस्था कोणती ?

(1) वैज्ञानिक तथा औद्योगिक अनुसंधान परिषद (C S I R)

(2) टाटा मूलभूत अनुसंधान संस्थान (T I F R)

(3) भारतीय विज्ञान संस्थान (IISc)

(4) भारतीय प्रोद्योगिकी संस्थान (I I T)

Renowned Scientist Homi Bhabha founded and directed two major Scientific Institutions that symbolise Nehruvian Vision. One of them was Atomic Energy Commission. The other was :

(1) Council for Scientific and Industrial Research

(2) Tata Institute of Fundamental Research

(3) Indian Institute of Science

(4) Indian Institute of Technology

38. विविध विषयांचे तज्ज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पुढील ठिकाणी आपली साक्ष नोंदवली.

(a) सायमन कमिशन

(b) युनिव्हर्सिटी रिफॉर्म्स कमिटी

(c) रॉयल कमिशन ऑन इंडिअन करन्सी अॅन्ड फायनान्स

(d) साउथ बरो कमिटि

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (b), (c) आणि (d) (2) केवळ (a), (b) आणि (c)

(3) केवळ (a) आणि (d) (4) सर्व (a), (b), (c) आणि (d)

As an expert on various subjects, Dr Babasaheb Ambedkar testified before :

(a) Simon Commission

(b) University Reforms Committee

(c) Royal Commission on Indian Currency and Finance

(d) South bourough Committee

Answer options :

(1) (b), (c) and (d) only (2) (a), (b) and (c) only

(3) (a) and (d) only (4) All (a), (b), (c) and (d)

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

39. तेभाग संघर्ष काय होता ?

(1) तेभाग या प्रदेशाच्या स्वातंत्र्याचा संघर्ष

(2) खंडाने शेत कसणाऱ्याला पिकाचा दोन-तृतीयांश वाटा मिळावा म्हणून केलेला संघर्ष

(3) भारत आणि पूर्व पाकिस्तानामधील छोट्या प्रदेशावरून झालेला संघर्ष

(4) पिकाचा कमीत कमी अर्धा हिस्सा मिळावा म्हणून केलेला संघर्ष

What was the Tebhaga Struggle ?

(1) Struggle for independence of Tebhaga region.

(2) Struggle for keeping two-thirds of the harvest for the share-cropper.

(3) Struggle for a small piece of land between India and East Pakistan.

(4) Struggle for keeping at least one-half of the harvest for the share-cropper.

---

40. पुढील दोन विधानांपैकी कोणते **अयोग्य** आहे ?

(a) फाळणीनंतर भारतातील बऱ्याच तागाच्या व कपड्याच्या/सूताच्या गिरण्या बंद कराव्या लागल्या कारण ताग व कापूस पिकविणारे मोठे क्षेत्र पाकिस्तानात गेले.

(b) अन्नधान्याचीही चणचण भारतात भासू लागली. गहू व तांदूळ पिकवणारे मोठे क्षेत्र पाकिस्तानला गेले.

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which one of the following two is **incorrect** ?

(a) After partition many jute and cotton textile factories had to be closed down for shortage of raw material as major jute and cotton growing areas went to Pakistan.

(b) There was also a shortage of food-grains in India as large parts of wheat and rice growing areas were now parts of Pakistan.

Answer options :

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

41. खालील शेतकऱ्यांच्या संघर्षाची कारणे व त्यांची ठिकाणे यांच्या जोड्या जुळवा :

(a)	कालव्याच्या पाण्याचे दर	(i)	बरद्वान, बंगाल
(b)	जमीनदारीला विरोध	(ii)	कालीपटनम् आंध्र प्रदेश
(c)	पाणी कराला विरोध	(iii)	सुकूर, सिंध
(d)	सारावाढीला विरोध	(iv)	अमृतसर, पंजाब

पर्यायी उत्तरे :

	(a)	(b)	(c)	(d)
(1)	(iii)	(i)	(ii)	(iv)
(2)	(iv)	(iii)	(ii)	(i)
(3)	(iii)	(iv)	(i)	(ii)
(4)	(i)	(ii)	(iii)	(iv)

Match the causes of Peasant Struggles with their places.

(a)	Canal water rates	(i)	Burdwan, Bengal
(b)	Anti Zamindari	(ii)	Kalipatnam, Andhra Pradesh
(c)	Anti water tax	(iii)	Sukur, Sindh
(d)	Anti revenue enhancement	(iv)	Amritsar, Punjab

Answer options :

	(a)	(b)	(c)	(d)
(1)	(iii)	(i)	(ii)	(iv)
(2)	(iv)	(iii)	(ii)	(i)
(3)	(iii)	(iv)	(i)	(ii)
(4)	(i)	(ii)	(iii)	(iv)

---

42. म. ज्योतीबा फुल्यांनी सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाची सोय करावी अशी मागणी कोणत्या आयोगासमोर केली ?

(1) सायमन आयोग (2) हंटर आयोग

(3) नेहरू आयोग (4) मोर्ले-मिंटो आयोग

Before which Commission did Mahatma Jyotiba Phule emphasise the need for the provision of Compulsory Primary Education ?

(1) Simon Commission (2) Hunter Commission

(3) Nehru Commission (4) Morle - Minto Commission

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

43. पुढील दोन विधानांपैकी कोणते **योग्य** आहे ?

(a) राजा राममोहन रॉय ह्यांना 'भारताच्या रिनेसन्सचे/प्रबोधनकाळाचे पितामह' मानले जाते. ते वाराणसी व पटना येथे शिकले.

(b) त्यांनी बंगाली, पर्शियन, हिंदी, इंग्लिश व संस्कृतमध्ये नियतकालिके प्रसिद्ध केली.

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which one of the following two statements is **correct** ?

(a) Raja Rammohan Roy regarded as 'the father of the Indian Renaissance' studied in Varanasi and Patna.

(b) He published journals in Bengali, Persian, Hindi, English and Sanskrit.

Answer options :

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

44. अस्पृश्यता निर्मूलनाचे छत्रपती शाहू महाराजांनी सक्रिय प्रयत्न केले. कोल्हापुरात एका व्यक्तीला 'सत्य सुधारक' हॉटेल सुरू करण्याची प्रेरणा दिली जिथे ते स्वत: नेहमी जात असत. या व्यक्तीचे नाव काय ?

(1) कृष्णा कांबळे (2) गंगाराम कांबळे

(3) रामचंद्र कांबळे (4) गणपत कांबळे

Chhatrapati Shahu Maharaj actively discouraged untouchability. He motivated a person to start 'Satya Sudharak' Hotel in Kolhapur which he would regularly visit. Name the person.

(1) Krishna Kamble (2) Gangaram Kamble

(3) Ramchandra Kamble (4) Ganpat Kamble

---

45. पंडिता रमाबाई ज्या खूप शिकलेल्या, सुंदर आणि बुद्धीमान होत्या, त्यांच्याबाबत पुढील विधानांपैकी कोणते **योग्य नाही** ?

(1) श्रीनिवास शास्त्री त्यांचा एकुलता एक भाऊ होता.

(2) बरेच आय.सी.एस. अधिकारी त्यांच्याशी लग्न करायला तयार होते.

(3) त्यांनी बिपिन बिहारी दासशी लग्न केले.

(4) वरील एकही नाही.

Which one of the following statements about Pandita Ramabai who was very learned, beautiful and intelligent is **not correct** ?

(1) Shrinivas Shastri was her only brother

(2) Many ICS officers wanted to marry her

(3) She married Bipin Bihari Das

(4) None of the above.

कच्च्या कामासाठी जागा /SPACE FOR ROUGH WORK

P.T.O.

www.mpscmaterial.com www.fb.com/mpscmaterial www.t.me/mpscbooks

46. 15 नोव्हेंबर, 1955 रोजी राज्य पुनर्रचना आयोगाच्या शिफारशींवर संसदेत चर्चा झाली. यावेळी एका संसद सदस्याने इशारा दिला होता की, ''मुंबई या राजधानीसह संयुक्त महाराष्ट्र याशिवाय काहीही मान्य होणार नाही''. हे सदस्य कोण ?

(1) स.का. पाटील (2) सी.डी. देशमुख

(3) न.वि. गाडगीळ (4) शंकरराव देव

On 15th November 1955, when the States 'Reorganization Commission's recommendations were discussed in the Parliament, a member warned, ''Anything short of Samyukta Maharashtra with Bombay as a capital, will not be acceptable''. Who was the MP ?

(1) S.K. Patil (2) C.D. Deshmukh

(3) N.V. Gadgil (4) Shankarrao Deo

---

47. पुढील दोन विधानांपैकी कोणते **योग्य** आहे ?

(a) जून 1947 मध्ये हैदराबाद आणि जुनागढ या राज्यांनी स्वतंत्र, सार्वभौम राज्ये होण्याची इच्छा व्यक्त केली.

(b) इंग्रज सरकारने त्यांच्यावर जुलै 1947 मध्ये भारत किंवा पाकिस्तानशी संलग्न होण्यास सक्ती केली.

पर्यायी उत्तरे :

(1) केवळ (a) (2) केवळ (b) (3) दोन्ही (4) एकही नाही

Which one of the following two statements is **correct** ?

(a) In June 1947 the states of Hyderabad and Junagarh expressed their desire to become independent sovereign states.

(b) The British Govt. prevailed upon them in July 1947 either to join India or Pakistan.

Answer options :

(1) Only (a) (2) Only (b) (3) Both (4) Neither

---

